सकाळ

# शिक्षणात मानवी मूल्यांचा अंतर्भाव आवश्यक

## जागतिक बौद्ध धर्मगुरू दलाई लामा यांचे प्रतिपादन

**सकाळ वृत्तसेवा**

मुंबई, ता. १२ : भारतीय संस्कृतीतील करुणा, अहिंसा या मूल्यांमुळे अनेक प्रश्न सोडवता येतात. म्हणून शिक्षण पद्धतीत मानवी मूल्यांचा समावेश केला पाहिजे, असे प्रतिपादन जागतिक बौद्ध धर्मगुरू दलाई लामा यांनी केले.

मुंबई विद्यापीठाच्या तत्त्वज्ञान विभागाच्या वतीने कलिना कॅम्पस येथे 'द कन्सेप्ट ऑफ मैत्री (मेत्ता) इन बुद्धिझम' या तीन दिवसीय आंतरराष्ट्रीय परिषदेच्या उद्घाटन समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. मैत्री, करुणा आणि प्रेमभावना यांचा अंगीकार करून अनेक मोठ्या समस्या सोडवता येतील. कोणत्याही समस्येचे निराकरण हातात शस्त्रे घेऊन होऊ शकत नाही. शस्त्रांमुळे जगाने मोठी किंमत मोजली आहे, असे ते म्हणाले. समस्यांचे निराकरण करण्यासाठी संवादाच्या मार्गाचा वापर करणे महत्त्वाचे आहे. विसंवादामुळे प्रश्नांची तकल कठीण होते, असे त्यांनी सांगितले.

विसाव्या शतकात लोकांना शांती हवी आहे. हिंसेला लोक कंटाळले आहेत. त्यामुळे आपण एकमेकांचा आदर ठेवून, एकत्वाची भावना दृढ केली पाहिजे. तशा पद्धतीच्या मूल्यांचा अंतर्भाव शिक्षणात गरजेचा आहे, असे दलाई लामा म्हणाले. या आंतरराष्ट्रीय परिषदेत अनेक मान्यवर आणि शिक्षणतज्ज्ञ बौद्धधर्मातील मैत्री या संकल्पेवर विचार मांडणार आहेत.



मुंबई : दलाई लामा मार्गदर्शन करताना.

### एकोप्याची गरज

अहिंसा आणि करुणेमुळे क्रोधावर सहजपणे मात करता येते, असे दलाई लामा यांनी नमूद केले. एकोप्यासाठी धर्माकडे पाहणे गरजेचे आहे. धर्माच्या नावावर लोकांची विभागणी स्वीकारार्ह नाही, असे त्यांनी आवर्जून सांगितले. राग, क्रोध आपल्या सुखी भावनेला नष्ट करतात. त्यामुळे त्यांना बाजूला ठेवून प्रेमभावनेने वागायला शिकले पाहिजे. शत्रूलाही प्रेमभावनेने सामोरे गेले पाहिजे, असेही ते म्हणाले.

Trupti Arekar | ADC



His Holiness, the XIVth Dalai Lama, inaugurated the International Conference on the theme of Maitri in Buddhism organised by the Department of Philosophy, University of Mumbai which will be open till December 14, in the Vidyanagari Campus, University of Mumbai, Santacruz, Kalina

# Dalai Lama interacts with college students at MU



Leader visits MU on Wednesday. —*RAJESH JADHAV*

**AGE CORRESPONDENT**
MUMBAI, DEC. 12

The Dalai Lama addressed students at the University of Mumbai (MU) on Wednesday. The Tibetan spiritual leader spoke about the 'Concept of Maitri (Metta) in Buddhism' that was organised by the department of philosophy, the centre for Buddhist studies, Kalina campus.

Also present was MU vice-chancellor Suhas Pednekar and VC of central institute of higher Tibetan studies, Varanasi, Geshe Ngawang Samten. While interacting with the students, the 83-year-old leader imparted knowledge about integrating peace and wisdom in education while excluding materialistic behaviour off the human beings.

"Loving kindness, metta maitri have to come from education rather from a religion," he stated. He further continued, "21st century should be a century of peace and dialogue. Everybody needs peace but everyone is tired of their own struggles. Hence, we should be helping and supporting each other through thick and thin."

The Dalai Lama will be seen visiting two other education institutions on Thursday and Friday during his three-day Mumbai tour. In Guru Nanak College at Sion, he will be delivering lecture on 'compassion and the need for universal responsibility'. The following day, in a lecture series, he will be featured in the 22nd edition of Tech fest, Indian Institute of Technology-Bombay (IIT-B).

In the lecture series at IIT-B, several other prominent personalities have been featured in the past like Dr Abdul Kalam, Dr John Forbes Nash Jr, Nobel Laureate in Economics, etc. The organiser of the Tech fest, a core team of 23 people chose him as one of the three speakers for this year's lecture series. The other two are Dr John C. Mather, Nobel Prize winner in physics - 2006 and professor Anima Anandkumar, director of machine learning research at NVIDIA.

# Dalai Lama interacts with college students at MU



Leader visits MU on Wednesday. —*RAJESH JADHAV*

**AGE CORRESPONDENT**
MUMBAI, DEC. 12

The Dalai Lama addressed students at the University of Mumbai (MU) on Wednesday. The Tibetan spiritual leader spoke about the 'Concept of Maitri (Metta) in Buddhism' that was organised by the department of philosophy, the centre for Buddhist studies, Kalina campus.

Also present was MU vice-chancellor Suhas Pednekar and VC of central institute of higher Tibetan studies, Varanasi, Geshe Ngawang Samten. While interacting with the students, the 83-year-old leader imparted knowledge about integrating peace and wisdom in education while excluding materialistic behaviour off the human beings.

"Loving kindness, metta maitri have to come from education rather from a religion," he stated. He further continued, "21st century should be a century of peace and dialogue. Everybody needs peace but everyone is tired of their own struggles. Hence, we should be helping and supporting each other through thick and thin."

The Dalai Lama will be seen visiting two other education institutions on Thursday and Friday during his three-day Mumbai tour. In Guru Nanak College at Sion, he will be delivering lecture on 'compassion and the need for universal responsibility'. The following day, in a lecture series, he will be featured in the 22nd edition of Tech fest, Indian Institute of Technology-Bombay (IIT-B).

In the lecture series at IIT-B, several other prominent personalities have been featured in the past like Dr Abdul Kalam, Dr John Forbes Nash Jr, Nobel Laureate in Economics, etc. The organiser of the Tech fest, a core team of 23 people chose him as one of the three speakers for this year's lecture series. The other two are Dr John C. Mather, Nobel Prize winner in physics-2006 and professor Anima Anandkumar, director of machine learning research at NVIDIA.

लोकमत

# शिक्षणात मानवी मूल्यांचा अतंर्भाव व्हावा - दलाई लामा

लोकमत न्यूज नेटवर्क



मुंबई : भारताला ज्ञानाची उज्ज्वल परंपरा आहे. पूर्वीपासूनच भारतीय संस्कृतीमध्ये अहिंसा, करुणा ही मूल्ये अस्तित्वात आहेत. शांतता आणि अहिंसेने अनेक प्रश्नांची उकल होऊ शकते. त्यासाठी मूळ मानवी मूल्यांना ओळखणे गरजेचे आहे. म्हणूनच मूळ मानवी मूल्यांचा शिक्षण पद्धतीत अंतर्भाव व्हावा, असे प्रतिपादन जागतिक बौद्ध धर्मगुरू दलाई लामा यांनी बुधवारी केले. मुंबई विद्यापीठाच्या तत्त्वज्ञान विभागाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या 'द कन्सेप्ट ऑफ मैत्री (मेत्ता) इन बुद्धिजम' या तीन दिवसीय आंतरराष्ट्रीय परिषदेच्या उद्घाटनाच्या प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते.

बौद्ध धर्मातील मैत्री संकल्पनेवर प्रकाश टाकताना ते पुढे म्हणाले की, मैत्री, करुणा आणि प्रेमभावना या मूळ तत्त्वांचा अंगीकार करून, अनेक मोठ्या समस्यांना उत्तर दिले जाऊ शकते. जीवनात कोणत्याही समस्यांचे निराकरण हातात शस्त्रे घेऊन होऊ शकत नाही. शस्त्रांमुळे जगाने मोठी किंमत मोजली आहे. संवादाचा वापर करणे गरजेचे आहे. २१व्या शतकात लोकांना शांती हवी आहे. हिंसेला लोक कंटाळले आहेत. त्यामुळे आपण एकमेकांचा आदर ठेऊन मूळ मानवी मूल्यांचा शिक्षण पद्धतीत अंतर्भाव करायला हवा. अहिंसा आणि करुणेमुळे क्रोधावर सहजपणे मात करता येते, असे ते म्हणाले.

एकोप्यासाठी म्हणून धर्माकडे पाहणे गरजेचे असून, धर्माच्या नावावर विभागणी होणे हे स्वीकाहार्य नसल्याचेही त्यांनी सांगितले. विभागाच्या वतीने तयार करण्यात आलेल्या फलॉसॉफिकल ट्रॅडिशन ऑफ द वर्ल्ड या जर्नलचे प्रकाशन त्यांच्या हस्ते करण्यात आले. तीन दिवस चालणाऱ्या या आंतरराष्ट्रीय परिषदेमध्ये अनेक मान्यवर आणि शिक्षणतज्ज्ञ बौद्ध धर्मातील मैत्री या संकल्पेवर त्यांचे विचार मांडतील.

सामाजिक न्याय मंत्री राजकुमार बडोले, मुंबई विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. सुहास पेडणेकर, प्र-कुलगुरु डॉ. रवींद्र कुलकर्णी, कुलसचिव डॉ. सुनिल भिरुड, तत्त्वज्ञान विभागाच्या विभाग प्रमुख प्रोफेसर डॉ. गीता रमणा, प्राध्यापक डॉ. अर्चना मलिक, आयोजन समितीचे सदस्य प्राध्यापक संदेश वाघ यांच्यासह अनेक मान्यवर या परिषदेला उपस्थित होते.

आपलं महानगर

# शस्त्रांऐवजी शिक्षणावर भर देणे गरजेचे

प्रतिनिधी ▸▸ मुंबई
connect@mymahanagar.com

## बौद्ध धर्मगुरू दलाई लामा यांनी मांडले मत



जीवनात कोणत्याही समस्यांचे निराकरण हातात शस्त्रे घेऊन होऊ शकत नाही. शस्त्रांमुळे जगाने मोठी किंमत मोजली आहे. आज सर्वच देश शस्त्र खरेदीवर पैसा खर्च करत आहे. परंतु, शस्त्र खरेदीऐवजी शिक्षण व गरीब देशांच्या विकासावर पैसा खर्च केला पाहिजे, असे मत जागतिक बौद्ध धर्म गुरू दलाई लामा यांनी व्यक्त केले. मुंबई विद्यापीठाच्या तत्वज्ञान विभागाच्या वतीने भरवलेल्या 'द कन्सेप्ट ऑफ मैत्री (मेत्ता) इन बुद्धीझम' या तीन दिवसीय आंतरराष्ट्रीय परिषदेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते.

मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू प्रोफेसर सुहास पेडणेकर, प्र-कुलगुरू डॉ. रवींद्र कुलकर्णी, कुलसचिव डॉ. सुनील भिरुड, तत्वज्ञान विभागाच्या विभाग प्रमुख प्रोफेसर डॉ. गीता रमणा, प्राध्यापक डॉ. अर्चना मलिक, आयोजन समितीचे सदस्य प्राध्यापक डॉ. संदेश वाघ आदी यावेळी उपस्थित होते. जगात शस्त्र बनवण्यासाठी भरपूर पैसा खर्च करण्यात येत आहे. परंतु, शस्त्र खरेदी करणे म्हणजे मोठ्या प्रमाणात पैसा वाया घालवण्यासारखे आहे. त्यामुळे शस्त्र खरेदीऐवजी शिक्षण व गरीब देशांच्या विकासावर पैसा खर्च झाला पाहिजे. शिक्षणामुळे प्रगत पिढी जन्माला येण्यास मदत होऊन व्यक्तीचे अंतरंग व बाह्यरंग बदलण्यास मदत होईल. शिक्षणामुळे शांती निर्माण होईल. २१ व्या शतकात लोकांना शांती हवी आहे. हिंसेला लोक कंटाळले आहेत. त्यामुळे आपण एकमेकांचा आदर ठेऊन एकत्वाची भावना अंगी बाळगून तशा पद्धतीच्या आंतरमुल्यांचा अंतर्भाव आपल्या शिक्षणात व्हावा असे दलाई लामा यावेळी म्हणाले.

मैत्री, करुणा, आणि प्रेम भावना या मूळ तत्वांचा अंगीकार करून अनेक मोठ्या समस्यांना उत्तर दिले जाऊ शकते. समस्यांचे निराकरण करण्यासाठी संवाद महत्वाचे आहे. विसंवादाने प्रश्नांची उकल होणे कठीण होत असल्याचे सांगत त्यांनी बौध्द धर्मातील 'मैत्री' संकल्पनेवर प्रकाश टाकला. मानवी मूल्यांवर आधारीत भारतीय तत्वज्ञानाची जगाला ओळख करुन देण्याची गरज विशद करतांना आधुनिक शिक्षणाबरोबरच भारतीय मानवी मुल्यांची सांगड घालणेही तितकेच गरजेचे आहे. भारताला ज्ञानाची एक उज्वल परंपरा आहे. पूर्वीपासूनच भारतीय संस्कृतीमध्ये अहिंसा, करुणा ही मूल्ये अस्तित्वात आहेत. अहिंसा आणि करुणेमुळे क्रोधावर सहजरित्या मात करता येत असल्याचेही त्यांनी नमूद केले.

### भावनेमुळे अनेक समस्या

क्रोध ही व्यक्तीच्या मनात निर्माण होणारी भावना अनेक समस्या निर्माण करते. त्यामुळे क्रोध बाजूला ठेवून प्रेम भावनेने वागायला शिकले पाहिजे. त्यासाठी मानसिक शांती महत्त्वाची आहे. मानसिक शांतीमुळे मन सुदृढ होण्यास मदत होते, असे बौद्ध धर्मगुरू दलाई लामा यांनी सांगितले. विभागाच्या 'फिलॉसॉफिकल ट्रॅडिशन ऑफ द वर्ल्ड' या जर्नलचे प्रकाशन लामा यांच्या हस्ते करण्यात आले. आंतरराष्ट्रीय परिषदेमध्ये अनेक मान्यवर आणि शिक्षणतज्ज्ञ बौद्धधर्मातील 'मैत्री' या संकल्पेवर त्यांचे विचार मांडणार आहेत.